आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

७ नोव्हेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- वन रँक वन पेन्शन योजनेला दहा वर्ष पूर्ण, ही योजना म्हणजे देशाच्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टीनं टाकलेलं पाऊल असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची माहिती
- भारत निवडणूक आयोगाचे उपायुक्त हिरदेश कुमार यांच्याकडून राज्यात विधानसभा निवडणूक तयारीचा आढावा / निवडणुकीत पारदर्शकता जपण्याचे दिले निर्देश
- विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वचननामा प्रसिद्ध, महाविकास आघाडीचा जाहीरनामा लवकरच जाहीर होईल अशी उद्धव ठाकरे यांची माहिती

**आणि**

- बिहार कोकिला' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ख्यातनाम गायिका शारदा सिन्हा यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

वन रँक वन पेन्शन योजना एकाच श्रेणीत सेवानिवृत्त झालेल्या सर्व सैनिकांना समान निवृत्ती वेतन देणारी आहे. असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. सेवानिवृत्तीची तारीख गृहित न धरता हे निवृत्तीवेतन लागू केलं जात असल्याने त्याचा फायदा भारतीय सैन्यदलातून निवृत्त झालेल्या सैनिकांना मिळत असतो. वन रँक वन पेन्शन योजनेला दहा वर्ष पूर्ण झाली असून यासाठी चालू आर्थिक वर्षात ४ हजार ४६८ कोटी रुपयांचा निधी राखून ठेवला आहे. यावर्षी ३० सप्टेंबर

त्यातील ८९५ कोटी रुपये सेवानिवृत्त सैनिकांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. वन रँक वन पेन्शन योजनेचा लाभ देशभरातील २५ लाख सेवानिवृत्त सैनिकांना झाला आहे. दर पाच वर्षांनी या योजनेचा आढावा घेण्यात येतो. नुकताच जुलै महिन्यात या योजनेचा आढावा घेण्यात आला होता.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे की, वन रँक वन पेन्शन योजना लागू करुन आता दहा वर्ष झाली असून देशातील सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टीनं टाकलेलं पाऊल आहे. ही त्या सैनिकांना वाहिलेली श्रद्धांजलीही आहे ज्यांनी देशाचं रक्षण करतांना आपल्या प्राणाची आहुती दिली.

**<><><><><>**

सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. गृहमंत्री शहा यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं दहशतवाद विरोधी परिषदेचं उद्धाटन करण्यात आलं. तीन नव्या फौजदारी कायद्यांमुळं नागरिकांच्या अधिकारांचं रक्षण होत असल्याचं अमित शहा म्हणाले. कर्तव्य निभावत असताना शहीद झालेल्या ३६ हजारांहून अधिक पोलिसांना शहा यांनी श्रद्धांजली अर्पण केली. राष्ट्रीय तपास संस्थेनं या दोन दिवसीय परिषदेचं आयोजन केलं आहे. केंद्रीय तपास संस्थांचे अधिकारी, न्यावैद्यक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची परिषदेला उपस्थिती आहे.

**<><><><><>**

श्रम सुविधा आणि समाधान पोर्टल अधिक कार्यक्षम आणि प्रभावी करण्यासाठी त्यात तांत्रिक सुधारणा करण्यात आल्याची माहिती केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. ते काल  पोर्टल आढावा बैठकीत

अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. तांत्रिक सुधारणा मुळे या पोर्टलचा वापर अधिक सुलभ होणार असून त्याचा लाभ देशभरातील आस्थापनांना होणार आहे. याद्वारे कामगारांच्या हिताचं संरक्षण तसचं त्यांच्या कामातही सुधारणा व्हायला मदत होईल असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

मतदारांपर्यंत मतदानाच्या चिठ्या वेळेवर द्याव्यात. मतदारयादीसंबधिच्या तक्रारींचा तातडीनं निपटारा करावा अशा सूचना भारत निवडणूक आयोगाचे उपायुक्त हिर्देशकुमार यांनी दिल्या  ते आज संभाजीनगर  येथील स्मार्ट सिटी कार्यालयात, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती विभागातल्या सर्व जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघांमधील निवडणूक तयारीच्या आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, यांच्यासह सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक काळात पारदर्शकता जपण्याच्या तसचं प्रत्येक टप्प्यावर राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या प्रतिनिधींना माहिती द्यावी.  मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रयत्न करावे. मतदारांना मतदान करणे सोईचे व सुलभ व्हावे यासाठी उपाययोजना राबवाव्या. मतदानाचे प्रमाण नेमके कळावे व त्यातील आकडेवारीत अधिक अचूकता यावी यासाठी या निवडणूकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीसाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नेमणूक आदी सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज मुंबई इथून आपला वचननामा प्रसिद्ध केला. पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वांद्रे इथल्या निवासस्थानी या वचननाम्याचं प्रकाशन झालं. रोजगार आणि

धारावी पुनर्वसन हे मुद्दे या वचननाम्यात नमूद आहेत. हा आपल्या पक्षाचा वचननामा असून महाविकास आघाडीचा सविस्तर जाहीरनामा येत्या काही दिवसात जाहीर होईल, असं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

<><><><><>

महायुतीचं सरकार हे सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी असलेलं सर्वसामान्यांचं सरकार आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत केलं. जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघांच्या शिवसेनेच्या उमेदवार मनिषा वायकर यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. महायुतीचं सरकार रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्याचं काम करेल, असंही शिंदे यावेळी म्हणाले. .यावेळी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा खासदार रविंद्र वायकर, शिवसेना महायुतीच्या उमेदवार मनिषा वायकर, माजी खासदार गजानन कीर्तिकर, शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे उपस्थित होते.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज अकोला आणि वाशीम जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जागृतीसाठी राबवण्यात येणाऱ्या स्वीप कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय संचार ब्यूरो आणि भारत निवडणूक आयोगाच्या वतीनं एक फिरतं प्रदर्शन उद्यापासून सुरु होणार आहे. प्रदर्शन लावलेल्या या गाड्या १५ निवडक जिल्ह्यांमधे मतदानविषयक जनजागृतीचा संदेश घेऊन जाणार आहेत.

उद्या मुंबईत सोहळ्यात भारत निवडणूक आयोग तसंच राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे वरीष्ठ अधिकारी, चित्रपट, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातल्या मान्यवरांचा उपस्थितीत मतदार जागृती उपक्रमांचा प्रारंभ होणार आहे. याच कार्यक्रमात या फिरत्या प्रदर्शन वाहनांना हिरवा झेंडा दाखवला जाणार आहे.

**<><><><><>**

'बिहार कोकिला' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ख्यातनाम गायिका शारदा सिन्हा यांच्या पार्थिवावर आज पाटणा इथं सरकारी इतमामात अंत्यसंस्कार झाले. माजी केंद्रीय मंत्री राम कृपा यादव आणि अश्वनी कुमार चौबे यावेळी उपस्थित होते. सांस्कृतिक क्षेत्रातल्या अतुलनीय योगदानासाठी ओळखल्या जाणाऱ्या गायिका शारदा सिन्हा यांचं मंगळवारी नवी दिल्ली इथं निधन झालं

**<><><><><>**

सॅटकॉम, अर्थात सॅटेलाइट द्वारे होणारा दूरसंवाद हा सध्या वापरात असलेल्या मोबाइल नेटवर्कशी स्पर्धा करणार नाही, मात्र तो त्याला पूरक असेल, असं दळणवळण राज्यमंत्री चंद्रशेखर पेमासानी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं तिसऱ्या भारतीय अंतराळ परिषदेला संबोधित करत होते. सॅटकॉम ला व्यापक कनेक्टिव्हिटी मिळावी, यासाठी ते 5G आणि 6G यासारख्या स्थलीय नेटवर्कला पूरक असल्याचे समजायला हवे, असे ते म्हणाले.

**<><><><><>**

रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे उद्यापासून १६४ विशेष गाड्या चालवणार आहे. यादृष्टीनं रेल्वेनं सुमारे ४७६ गाड्यांचं नियोजन केले आहे. दरम्यान मागच्या छत्तीस दिवसांमध्ये ४ हजार ५२१ रेल्वे गाड्या चालवल्या, ६५ लाख प्रवाशांनी याचा लाभ घेतल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली. या

महिन्याच्या ४ तारखेला एकाच दिवसात तीन कोटींपेक्षा जास्त प्रवाशांनी रेल्वे प्रवास केल्याचंही मंत्रालयानं कळवलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडन यांनी नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं अभिनंदन केलं आहे. देशाच्या एकसंध प्रगतीसाठी सत्तेचं शांततापूर्वक हस्तांतरण केलं जाईल असं ते म्हणाले. ज्यो बायडन आज देशाला उद्देशून आपला संदेश देणार असल्याचंही व्हाईट हाऊसनं म्हटलं आहे. उपराष्ट्राध्यक्ष व या निवडणुकीतील पराभूत उमेदवार कमला हॅरिस यांनीही दूरध्वनी वरुन डोनाल्ड ट्रम्प याचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

स्पेनच्या पूर्वेकडच्या प्रांतात आलेल्या विनाशकारी पुरामध्ये ८९ नागरिक अद्याप बेपत्ता आहेत, तर मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २१७ वर पोहोचली आहे. पूरग्रस्त भागात बचाव कार्य सुरु आहे. स्पेनचे प्रधानमंत्री पेद्रो सांचेझ यांनी पूरग्रस्तांसाठी जाहीर केलेल्या १० अब्ज ६० कोटी युरो, इतक्या मदत निधीला स्पेन सरकारनं मंजुरी दिली आहे. आणखी मदत जारी करण्यासाठी युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक आणि स्पॅनिश सरकार, नियोजन करत आहेत.

**<><><><><>**

फिनलंडमधे हेलसिंकी इथं सुरू असलेल्या एचपीपी खुल्या टेनिसमध्ये भारताच्या दिवीज शरण आणि त्याचा इस्राईली साथीदार डॅनिएल यांनी पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या सामन्यात त्यांनी झेशियाचा मॅटेज आणि डेन्मार्कचा जोहान्स या जोडीचा ७ - ६, ७ - ५ असा सरळ सेटमध्ये

पराभव केला. आता पुढच्या फेरीत या जोडीचा सामना आज इटलीचा मार्को आणि फिनलंडचा पॅट्रिक या जोडीसोबत होणार आहे.

**<><><><><>**

आज राष्ट्रीय कर्करोग जनजागृती दिवस आहे. कर्करोग प्रतिबंध, लवकर निदान आणि उपचारांबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने, ७ नोव्हेंबर २०१४ पासून हा दिवस साजरा केला जातो. आजच्या दिवशी नागरिकांना सरकारी रुग्णालयांमध्ये कर्करोगाचं मोफत स्क्रीनिंग करून घेण्यासाठी, तसंच केंद्रसरकारच्या आरोग्य विषयक योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहन दिलं जातं.

पोलिश-फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ आणि रसायनशास्त्रज्ञ मेरी क्युरी यांची आज जयंती देखील आहे. त्यांच्या रेडियम आणि पोलोनियमच्या संशोधनानं कर्करोगाच्या उपचारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**<><><><><>**

राजधानी दिल्ली मधल्या हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून, आज सकाळी इथल्या हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक ३६६ इतका नोंदवला गेला. पुढले २ ते ३ दिवस राजधानी दिल्ली परिसरात सकाळी आणि रात्री हवेत धुरकं आणि हलक्या स्वरूपाच्या धुक्याचा थर राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.